यशदा, पुणे या संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या महाराष्ट्र लँड टायटलिंग ॲक्टच्या मसुद्याची छाननी करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन निर्णय क्र. जमीन-२०२६/प्र.क्र.७५/जमीन-०१/(ई-१७५२१८८)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १६, जुलै, २०२६.

प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्यासाठी 'लँड टायटलिंग ॲक्ट'चा (Land Titling Act) मसुदा तयार करण्याचे काम 'यशदा, पुणे' या संस्थेकडे सोपविण्यात आले होते. सदर संस्थेचा या संदर्भातील सविस्तर अहवाल व अधिनियमाचा मसुदा लवकरच शासनास प्राप्त होणार आहे.

सदर अहवाल आणि अधिनियमाच्या मसुद्याच्या आधारे शासनास अंतिम निर्णय घेणे सुलभ व्हावे, याकरिता प्राप्त होणाऱ्या अहवालाची व मसुद्याची सखोल छाननी व अभ्यास करणे आवश्यक आहे. या उद्देशाने एक उच्चस्तरीय छाननी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

यशदा, पुणे यांचेकडून प्राप्त होणाऱ्या लँड टायटलिंग ॲक्ट बाबतच्या अहवालाची व प्रारुप अधिनियमाची सर्वंकष छाननी करण्यासाठी शासन याद्वारे **विभागीय आयुक्त, नाशिक** यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करीत आहे :-

समितीची रचना :-

अ.क्र.	पदनाम/सदस्य	समितीमधील पद
१.	विभागीय आयुक्त, नाशिक	अध्यक्ष
२.	विभागीय आयुक्त, नाशिक यांना योग्य वाटतील असे दोन जिल्हाधिकारी	सदस्य
३.	जमाबंदी आयुक्त, पुणे (किंवा त्यांचे नियुक्त प्रतिनिधी)	सदस्य
४.	नोंदणी महानिरीक्षक व नियंत्रक मुद्रांक (IGR), पुणे (किंवा त्यांचे नियुक्त प्रतिनिधी)	सदस्य
५.	श्री. शेखर गायकवाड, सेवानिवृत्त, भा.प्र.से.	सदस्य

६.	अध्यक्षांच्या मान्यतेने आमंत्रित करण्यात येणारे इतर तज्ज्ञ व्यक्ती	सदस्य
७.	सह/उप सचिव, विधी व न्याय विभाग	सदस्य

समितीसाठी अटी व शर्ती:

१) **कार्यकक्षा:** सदर समिती यशदा, पुणे कडून प्राप्त होणाऱ्या अहवालाची आणि प्रस्तावित 'लँड टायटलिंग ॲक्ट' च्या मसुद्याची कायदेशीर व प्रशासकीय बाबींच्या अनुषंगाने सखोल छाननी करेल.

२) **कालावधी:** समितीने आपला अंतिम छाननी अहवाल व शिफारसी, हा आदेश निर्गमित झाल्यापासून किंवा यशदाचा अहवाल प्राप्त झाल्यापासून **१५ (पंधरा) दिवसांच्या आत** शासनास सादर करण्यात यावा.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७१६१७५२३९७९४८ असा आहे, हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=637145FD393D6D5C713E94E6DA7BC6BEE23011448B7FC64D138630B9C76AE7A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2026.07.16 17:53:34 +05'30'

(संजय धारुरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (क्रिडा व युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८). विभागीय आयुक्त, नाशिक (अध्यक्ष).
९). जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) नोंदणी महानिरीक्षक व नियंत्रक मुद्रांक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) महासंचालक, यशदा, पुणे.
१२) सर्व संबंधित जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त नाशिक यांच्यामार्फत).
१३) निवडनस्ती जमीन-०१.